| | | सुनावणीचा दि. 16.12.2024 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 1 | 10522 /2021 | श्री. दिपक अशोकरा काकडे, व्दारा. सुधीर जोशी, प्लॉट नं. 67, समर्थनगर छत्रपती संभाजीनगर | उप प्रवंधक, मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद | प्रवंधक, मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद | |
| 2 | 6095/ 2021 | श्री. राजेंद्र मधुकरराव वरके, रा. लक्ष्मीनगर गल्ली, किल्ला धारुर ता. किल्लाधारुर जि. वीड | गट विकास अधिकारी (प्रशासन) विकास आस्थापना शाखा विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर | उपायुक्त विकास आस्थापना, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | |
| 3 | 1684/ 2023 | श्री. पदमाकर वंडु पगार, रा. प्लॉट नंबर 9/10, ग्रोथ सेंटर गट नंबंर 170, जिजामातानगर, सिडको महानगर-1 वाळुज MIDC ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | अध्यक्ष, भारतीय ग्रामिण पुनरंचना संस्था, पी.75, राजर्षी शाहु इंन्स्टियुट, , गरवारे पॉलिस्टेरच्या पाठिमागे, चिकलठाण MIDC, छत्रपती संभाजीनगर ND | सचिव, भारतीय ग्रामिण पुनरंचना संस्था, पी.75, राजर्षी शाहु इंन्स्टियुट, गरवारे पॉलिस्टेरच्या पाठिमागे, चिकलठाण MIDC, छत्रपती संभाजीनगर | |
| 4 | 9093/ 2022 | श्री. फिरोज सय्यद करीम, रा. घर नं. 1216, गवळीपुरा छावणी, छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. स्मार्ट सिटी डव्हलपमेंट कार्पोरेशन, डॉ. वावासाहेव आंबेडकर रिसर्च सेंटर, छत्रपती संभाजीनगर | ज.अ.अ. स्मार्ट सिटी डव्हलपमेंट कार्पोरेशन, डॉ. वावासाहेव आंवेडकर रिसर्च सेंटर, छत्रपती संभाजीनगर | |
| 5 | 8196/ 2022 | श्री.सय्यद सावेर सय्यद सरदार, रा. हीना मंजिल नुर कॉलनी टाऊन हॉल, छत्रपती संभाजीनगर | शिक्षण विभाग, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर | शिक्षणाधिकारी, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर | |
| 6 | 3874/ 2022 | श्री. कैलास लक्ष्मण गायकवाड, रा. इंदिरानगर, वायजीपुरा, गल्ली नं. 21, छत्रपती संभाजीनगर | लेखा अधिकारी, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर | मुख्य लेखा अधिकारी, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर | |
| 7 | 7209/ 2022 | श्री. कचरु छगणराव घोडके, रा. संतोषी माता मंदिर, समतानगर, छत्रपती संभाजीनगर | कनिष्ठ लिपीक, कामगार विभाग, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर | उप आयुक्त, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर | |
| 8 | 7853/ 2022 | श्री. सय्यद सावेर सय्यद सरदार, रा. हिना मंजिल, नुर कॉलनी टाऊन हॉल, छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. अग्णीशमन विभाग महानगरपालिका कोकण वाडी छत्रपती संभाजीनगर | मुख्य अग्णीशमन अधिकारी, महानगरपालिका कोकण वाडी, छत्रपती संभाजीनगर | |
| 9 | 10053 /2022 | श्री. लक्ष्मण डिगंवर भुतकर, रा. आंवेडकरनगर, एन-7, सिडको छत्रपती संभाजीनगर | अग्निशमन अधिकारी, महानगरपालका, पदमपुरा छत्रपती संभाजीनगर | अग्निशमन अधिकारी, महानगरपालका, पदमपुरा छत्रपती संभाजीनगर | |
| 10 | 10256 /2022 | श्री. शिवलाल मिठ्ठु खरात, रा. प्रसन्न दाता पार्क, देवळाई रोड, छत्रपती संभाजीनगर | पशुसंवधन अधिकारी, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर | उपायुक्त, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 16.12.2024 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 11 | 10257/2022 | श्री. शिवलाल मिठ्ठु खरात, रा. प्रसन्न दाता पार्क, देवळाई रोड, छत्रपती संभाजीनगर | पदनिर्देशित अधिकारी (अतिक्रमण), महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर | अतिरिक्त आयुक्त-2, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर | |
| 12 | 3397/2022 | श्री. मोहम्मद नेमान मोहम्मद युनुस शेख, रा. मेंटर कॉम्युटर दुकान क्र. 02, गुलशन महल जुने जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, छत्रपती संभाजीनगर | वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर | आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर | |
| 13 | 3389/2022 | श्री. मोहम्मद नेमान मोहम्मद युनुस शेख, रा. मेंटर कॉम्युटर दुकान क्र. 02, गुलशन महल जुने जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, छत्रपती संभाजीनगर | वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर | आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर | |
| 14 | 5336/2022 | श्री. सय्यद झाकिर अली सय्यद महमुद अली, रा. अमीन उर्दु शाळेजवळ, आसिफीया कॉलनी, छत्रपती संभाजीनगर-431001 | ज.मा.अ. गुंठेवारी विभाग, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर | ज.अ.अ. गुंठेवारी विभाग, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर | |
| 15 | 6092/2022 | श्री. सुभेदार इर्शाद मुहम्मद खान, रा. 1-24-53/ पी, रोहीला गल्ली, छत्रपती संभाजीनगर-431001 | वार्ड अधिकारी, वार्ड क्र. 04, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर | कर निर्धारक व संकलक अधिकारी, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर | |
| 16 | 4028/2022 | श्री. निवृत्ती रंगनाथ सोनवणे, मु.पो. सवदगाव ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद उप विभाग (ल.पा.), वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद उप विभाग (ल.पा.), वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 17 | 5076/2022 | श्री. प्रतापराव गंगाधर सामवंशी, रा. लाडगांव ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | कार्यकारी अभियंता, नांदुर माधमेश्वर पाटबंधारे विभाग वैजापुर ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | कार्यकारी अभियंता, नांदुर माधमेश्वर पाटबंधारे विभाग वैजापुर ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 18 | 1149/2023 | श्री. प्रतापराव गंगाधर सामवंशी, रा. लाडगांव ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप कार्यकारी अभियंता, नांदुर माधमेश्वर पाटबंधारे विभाग वैजापुर ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | कार्यकारी अभियंता, नांदुर माधमेश्वर पाटबंधारे विभाग वैजापुर ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 19 | 9182/2022 | श्री. गुलाबराव तुकाराम भोंडवे, रा. अहिल्या निवास राधाकृष्ण नगरी, पांगरी रोड ता. जि. बीड | शिक्षण उप निरीक्षक, शिक्षण उपसंचालक कार्यालय छत्रपती संभाजीनगर | शिक्षण उप निरीक्षक, शिक्षण उपसंचालक कार्यालय छत्रपती संभाजीनगर | |
| 20 | 10433/2022 | श्री. देशमुख मोईन अब्दुल लतीफ, रा. घर नं. 10/8, गजानन हौसिंग सोसायटी, जुना मुकुंदनगर, छत्रपती संभाजीनगर रोड, अहमदनगर | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), वनपरिक्षेत्र कार्यालय अजिंठा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | सहायक वनसंरक्षक (प्रादेशिक), सहायक वनसंरक्षक कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 16.12.2024 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 21 | 223/2022 | श्री. शेख जिलानी शेख कादर, रा. प्लॉट नं. 6, पेरिविकल इंग्रजी शाळे समोर काला दरवाजा छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 22 | 2160/2022 | श्री. प्रमोद त्रिंबकराव भालेराव, रा. नृसिंह कॉलनी समोर गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार (महसुल-1), तहसिल कार्यालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 23 | 8098/2022 | श्री. भास्कर शामराव जगताप, रा. कोटनांद्रा पो. तळणी ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार (निवडणुक), तहसिल कार्यालय गंगापुर जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 24 | 8204/2022 | श्री. राजाभाऊ ज्ञानोबा पवार, रा. घर नं. 651, मुर्तीजपुर म्हाडा कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | महावितरण कार्यालय म्हाडा कॉलनी मुर्तीजापुर छत्रपती संभाजीनगर ND | अतिरिक्त कार्यकारी अभियता, महावितरण, चिकलठाणा उपविभाग छत्रपती संभाजीनगर | |
| 25 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 26 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 27 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 28 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 29 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 30 | 0 | 0 | 0 | 0 | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक १०५२२/२०२१**

श्री.दिपक अशोकराव काकडे,
व्दारा-श्री सुधीर जोशी, प्लॉट नं.६७, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उप-प्रबंधक (प्रशासन),
मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्रबंधक (प्रशासन),
मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १६.१२.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.२५.१०.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने श्री.एम.ए.दडके, कक्ष अधिकारी उपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| ०१ | ०७.०६.२०२१ | 1. Copy of the circular / decision shortlisting the candidates for the post of staff Drivers pursuant to the advertisement No. Administrations /982/2018 dated 21.06.2018 inviting applications for preparation of select list and wait list of 5 candidates each issued by the Registrar (Administration), High court of Bombay bench at Aurangabad व इतर 13 मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडुन मिळालेली आहे. तथापि उपलब्ध करुन दिलेली माहिती समाधानकारक नाही. माहिती अर्जात नमूद जाहिरातीच्या अनुषंगाने उमेदवार म्हणून आवेदनपत्र सादर केलेले आहे. तथापि निकषांची पुर्तता केलेली असताना संबंधित पदाकरिता डावलण्यात आलेले आहे. म्हणुन माहिती अधिकारातंर्गत माहितीची मागणी केलेली आहे. उमेदवार म्हणून माझ्यावर अन्याय झालेला असल्यामुळे ज्या माहितीची मागणी केलेली आहे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की,

अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.२४.०६.२०२१ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन समर्थक माहिती व वस्तुस्थिती अपिलार्थी यांना अवगत केलेली आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात नमूद निवड प्रक्रिया ही संगणकीय प्रणालीव्दारे राबविण्यात आलेली आहे. या संगणकीय निवड प्रक्रियेमध्ये पात्र उमेदवारांना पुढील चाचणीकरिता संधी देण्यात आलेली आहे. या संगणकीय निवड प्रक्रियेमध्ये अपिलार्थी पात्र ठरले नसल्यामुळे त्यांना पुढील चाचणीकरिता अथवा प्रक्रियेकरिता संधी मिळालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०४.०८.२०२१ रोजी सुनावणी घेऊन दि.२०.०८.२०२१ रोजी निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील फेटाळलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी समाधानकारक माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने, अधिनियमातील तरतुदीनुसार ज्यावेळी माहितीचा अर्ज प्राप्त होतो त्यावेळी जी माहिती अथवा वस्तुस्थिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच माहिती ज्या स्थितीत उपलब्ध असेल ती त्याच स्थितीत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. माहिती तयार करुन देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, माहिती तक्त्यामध्ये देणे, व्यापक जनहिताशी निगडित नसलेली माहिती देणे, एखादी कार्यवाही करुन माहिती देणे, एखाद्या कार्यवाहीमागील कारण / खुलासा देणे, भविष्यात माहिती प्राप्त होईल म्हणुन माहितीचा अर्ज प्रलंबित ठेवणे इ. प्रक्रियेचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. तसेच महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर व १५० शब्दाच्या मर्यादेत माहितीची मागणी अनुज्ञेय आहे. या अनुषंगाने अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे माहितीची मागणी करताना ती १५० पेक्षा अधिक शब्दांव्दारे केली असल्याचे निदर्शनास येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता, या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही. प्रसंगावशात, आज रोजी अपिलार्थी यांनी आयोगासमोर केलेल्या युक्तिवादाच्या अनुषंगाने माहितीची मागणी करण्यामागे अपिलार्थी यांची काही तक्रार असल्याचे दिसुन येत आहे. या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्या संदर्भात पाठपुरावा करणे संयुक्तिक होईल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ.१०५२२/२०२१/एस/- 22 दिनांक :- 2/1/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६०९५/२०२१**

श्री.राजेंद्र मधुकरराव बरके, — अपिलार्थी
रा.लक्ष्मीनगर गल्ली, किल्ले धारुर, ता.किल्ले धारुर, जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कक्ष अधिकारी,
उपआयुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
गट विकास अधिकारी,
उपआयुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १६.१२.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.२३.०६.२०२१ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| ०२ | ०५.१२.२०२० | १. दि.२८ सप्टेंबर हा आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिवस सन २००८ पासुन दरवर्षी कार्यालयात व कार्यालय अंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषदमध्ये साजरा करण्यात आलेल्या पुराव्यानिशी माहिती वर्षनिहाय, २. साजरा केलेला नसेल तर त्याचीही पुराव्यानिशी माहिती, ३. २८ सप्टेंबर हा आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिवस साजरा करणारे नसाल तर त्याची कारणांसहीत पुराव्यानिशी माहिती लेखी साक्षांकित करुन मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती कार्यालयाच्या अधिनस्त सर्व जिल्हा परिषदेशी संबंधित असल्यामुळे अपिलार्थी यांचा दि.०५.१२.२०२० रोजीचा (कार्यालयास प्राप्त दि.०६.०१.२०२१) माहितीचा अर्ज आठही जिल्हा परिषदेकडे कलम ६ (३) नुसार वर्ग केलेला आहे व तसे अपिलार्थी यांना अवगत करुन त्या त्या जिल्हा परिषदेकडे संपर्क करुन माहिती प्राप्त करुन घेण्याचे सुचित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपूर्ण, अर्धवट माहिती मिळाली, असे कारण नमूद केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जिल्हा परिषदेशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाशी संबंधित असल्यास अशा माहितीकरिता अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) नुसार जास्तीत जास्त पाच दिवसात माहितीशी संबंधित एका कार्यालयाकडे

वर्ग करुन उर्वरित कार्यालयाकडे स्वतंत्र माहितीचा अर्ज करणेबाबत अपिलार्थी यांना सुचित करणे आवश्यक आहे. तसेच असा माहितीचा अर्ज वर्ग करताना जी माहिती कार्यालयात उपलब्ध आहे ती प्रथमत: उपलब्ध करुन देऊन उर्वरित माहितीकरिता माहिती अर्ज वर्ग करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी व कार्यालयाच्या अधिनस्त जिल्हा परिषदेची माहिती मागितली असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे कार्यालयाशी संबंधित माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक ठरत आहे. तसेच अपिलार्थी यांनी त्यांना हव्या असलेल्या उर्वरित माहितीकरिता (जिल्हा परिषदेशी संबंधित माहितीकरिता) सुसंगत कार्यवाही करुन माहिती प्राप्त करुन घेणे उचित ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, उपाआयुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती (विकास (आस्थापना शाखा), विभागीय आयुक्त कार्यालयाशी संबंधित), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. गट विकास अधिकारी, उपाआयुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.वि.अ.६०९५/२०२३/एस/- 28 दिनांक :- 2/1/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०९३/२०२२**

श्री.फिरोज सय्यद करीम, — अपिलार्थी
रा.घर नं.१२१६, गवळीपुरा, छावणी, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
प्रकल्प व्यवस्थापक,
छत्रपती संभाजीनगर स्मार्ट सीटी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
लेखाधिकारी,
छत्रपती संभाजीनगर स्मार्ट सीटी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १६.१२.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.०८.११.२०२२ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| ०४ | १०.०८.२०२२ | औरंगाबाद क्रांती चौक शिवाजी महाराज पुतळ्या जवळ नवीन व जुने बांधकाम बाबत तपशिलवार सत्यप्रत देण्यात यावी,<br>अ. औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन अंतर्गत जुने व नवीन बांधकाम करण्यात येत असल्यास तसेच वर्क ऑर्डर, इस्टीमेट, एमबी कॉपीची सत्यप्रत देण्यात यावी,<br>ब. वरील कामाची निरीक्षण कोणत्या अधिकारी व कर्मचारी यांनी केले त्यांच्या नाव व हुद्यासह निरीक्षण केल्याची सत्यप्रत देण्यात यावी,<br>क. तसेच कामे केलेल्या ठेकेदारास स्मार्टसिटी विभागाकडुन किती रक्कम देण्यात आली त्या रकमेचे चेक नंबर देण्यात यावे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिला किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. तथापि अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी

केलेली माहिती वर्तमान जन माहिती अधिकारी उपलब्ध करुन देतील ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, हवी असलेली माहिती दिली नाही, ती अपूर्ण स्वरुपात दिली, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प व्यवस्थापक, छत्रपती संभाजीनगर स्मार्ट सीटी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती (पूर्वी दिलेली माहिती वगळून) अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. लेखाधिकारी, छत्रपती संभाजीनगर स्मार्ट सीटी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.१०९३/२०२२/एस/- 29 दिनांक :- 7/1/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

व्दितीय अपील क्रमांक ८१९६/२०२२

श्री.सय्यद साबेर सय्यद सरदार,
रा.हीना मंजील नुर कॉलनी टाऊन हॉल, छत्रपती संभाजीनगर ... अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
शिक्षण विभाग, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर ... : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी,
शिक्षण विभाग, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर ... : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १६.१२.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.०३.१०.२०२२ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| ०५ | १२.०७.२०२२ | शासकीय निम शासकीय प्राथमिक / माध्यमिक / उच्च माध्यमिक (शाळा मध्ये) पहिली ते दहावीपर्यंतच्या मराठी, उर्दू, हिंदी, इंग्रजी हे शिक्षण घेणारे मुली, मुले यांना शासनातर्फे कोणकोणती सुविधा, शालेय पोषण आहार, मुले मुलीची फीच्या बाबतीत शासन नियमावलीची झेरॉक्स प्रत, पाठ्यपुस्तक, कपडे आदी काय सुविधा देण्यात येते शासन नियमावली व शालेय पोषण आहाराचे आठवडा मेनु सहित शासन आदेशाची झेरॉक्स प्रती, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीसाठी कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील कागदपत्रावरुन होत नाही. अपिलार्थी यांनी आज रोजीच्या सुनावणीच्या अनुषंगाने त्यांचे दि.१६.१२.२०२४ रोजीचे लेखी निवेदन आयोगाच्या पटलावर सादर केलेले आहे. त्यामध्ये त्यांनी शासन नियमावलीची प्रत मिळुन द्यावी, असे नमूद केलेले आहे. तसेच अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देणेकरिता कसलाच प्रतिसाद नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

<u>आदेश</u>

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या वर

नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद माहितीसंदर्भात उपलब्ध शासन निर्णयाची / नियमावलीची प्रत, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्हि.अ.८१९६/२०२२/एस/-30 दिनांक: 2/1/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक ३८७४/२०२२**

श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड, — अपिलार्थी
रा.इंदिरानगर, बायजीपुरा, गल्ली नं.२१, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
लेखा अधिकारी,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्य लेखा अधिकारी,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक १६.१२.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.२८.०४.२०२२ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| ०६ | २२.०२.२०२२ | १. मे. इलेक्ट्रॉन एनर्जी इफीसेन्सी एल.एल.पी. या कंपनीचे मला जा.क्र.मनपा / लेखा २०२२ / ३६५ / २७ / १ / २०२२ दिलेल्या पत्रानुसार ४२ सीसी व व्हाऊचर व्दारे अदा करण्यात आलेल्या देयकात जीएसटी समाविष्ठ केल्या असल्याने कंपनीने शहरात लावलेले पथदिवे व केबल, पोल इतर साहित्याबाबतचे इनवाईस / बिल देण्यात यावे,<br>२. मे. इलेक्ट्रॉन एनर्जी इफीसेन्सी एल.एल.पी. या कंपनीने केलेल्या लेबर पेमेंट टेंडर क्लॉज पार्ट बी मधील अ.क्र.६ नुसार देण्यात आलेल्या लेबर पेमेंटनुसार भरलेले सर्व्हीस टॅक्स / प्रोफेशनल टॅक्स / पीएफ भरल्याबाबतच्या पावत्या देण्यात याव्यात,<br>३. अकाऊंट कोड नुसार जास्तीत जास्त पैसे व्हाऊचरव्दारे अदा करण्याच्या नियमाची प्रत देण्यात यावी,<br>४. मुख्यलेखाधिकारी यांना व्हाऊचरव्दारे जास्तीत जास्त रक्कम अदा करण्याबाबतच्या मर्यादेच्या आदेशाची प्रत देण्यात यावी, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीसाठी कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील

कागदपत्रावरुन होत नाही. मात्र अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा लेखा अधिकारी, लेखा विभाग, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क देण्यात यावी.

२. मुख्य लेखा अधिकारी, लेखा विभाग, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.वि.अ. ३८७४/२०२२/एस/-31 दिनांक : 7/1/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ७२०९/२०२२

श्री.कचरु छगनराव घोडके,
रा.संतोषी माता मंदीर, समतानगर, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
कनिष्ठ लिपिक,
कामगार विभाग, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उप आयुक्त,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १६.१२.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.०२.०९.२०२२ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| ०७ | ०२.०५.२०२२ | १. महानगरपालिकेत एकुण किती एजन्सी मार्फत कंत्राटी कर्मचारी कामावर घेतले आहेत, त्याचा नावासहीत खुलासा,<br>२. महानगरपालिकेत एकुण किती कर्मचारी कंत्राटी स्वरुपात घेतले आहेत त्याचा खुलासा पी.एफ. नंबरसहीत देण्यात यावा,<br>३. महानगरपालिकेत ज्या एजन्सीमार्फत कंत्राटी कर्मचारी नियुक्त केले आहेत त्या एजन्सीची किती वर्षाकरिता नियुक्ती केलेली आहे तसेच कोणत्या आधारवर एजन्सी नियुक्त केली गेली याचा खुलासा करावा..<br>४.महानगरपालिकेला एजन्सीला पुरविलेल्या कंत्राटी कर्मचारी यांचा दरमहा पी.एफ, इएसआय, प्रोफेशनल टॅक्स, जीएसटी भरणा केल्याची पावती मनपा लेखा विभागात तसेच कामगार विभागात जमा केली जाते का, जमा केली जात असल्यास त्याची दरमहा पावतीची सत्यप्रत देण्यात यावी,<br>५. दरमहा पावती घेणे बंधनकारक नसल्यास लेखी स्वरुपात खुलासा करावा,<br>६. महानगरपालिकेमार्फत एजन्सीला देण्यात आलेल्या वेतनाचा खुलासा करावा व एजन्सी मार्फत कर्मचाऱ्यास देण्यात आलेल्या मासिक वेतनाची पावती महापालिकेला घेणे बंधनकारक |

| | | |
|---|---|---|
| | | आहे का नाही, तसेच महानगरपालिकेने कर्मचाऱ्यास योग्य वेतन मिळाले असल्याचे शहानिशा केली आहे का, संबंधित कागदपत्रांची सत्यप्रत देण्यात यावी, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीसाठी कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील कागदपत्रावरुन होत नाही. मात्र अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लिपिक, कामगार विभाग, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठाच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क देण्यात यावी.

२. उपआयुक्त, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.वि.अ.७२०९/२०२२/एस/ 32 दिनांक : 7/1/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ७८५३/२०२२

श्री.सय्यद साबेर सय्यद सरदार,
रा.हीना मंजील नुर कॉलनी टाऊन हॉल, छत्रपती संभाजीनगर ... अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उप अग्निशमन केंद्र अधिकारी,
अग्निशमन विभाग, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर ... : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्य अग्निशमन अधिकारी,
अग्निशमन विभाग, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर ... : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १६.१२.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.२१.०९.२०२२ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| ०८ | २३.०६.२०२२ | शहरातील सर्व हॉटेल्स / इमारती / अपार्टमेंट / व आदिना आपल्या कार्यालयामार्फत फायर परवानगी देण्यात आली सर्व माहिती मिळणेबाबत, औरंगाबाद महानगरपालिका व शहरातील मॉल / हॉटेल / दुकाने / अपार्टमेंट / इमारती / शासकीय व निमशासकीय कार्यालये आदीना आपल्या कार्यालयामार्फत देण्यात आलेले फायर परवानगीची दिनांक सहीत वर्षनिहाय नाव व पत्त्यासहीत यादी द्यावी तसेच २०२२ या वर्षात नुतनीकरण ना झालेले व नुतनीकरण झालेल्यांची यादी तसेच फायर परवानगी घेण्याकरिता कोण कोणती कागदपत्र दाखल करावी, वरील प्रमाणे प्रत्येकी किती फीस आकारली जाते शासन नियमावलीसहीत मागणी केलेली पूर्ण माहिती द्यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात दि.१७.०८.२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिलेला आहे. या प्रकरणाच्या अनुषंगाने असे निवेदन करण्यात येते की, मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचेकडील दि.२६.०९.२०१३ रोजीच्या निर्देशामध्ये सार्वजनिक प्राधिकरणाने, वास्तु / इमारतीचे नकाशे / कागदपत्रे मागितल्यास ते सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन तसेच सार्वजनिक हित असल्याशिवाय देण्यात येऊ नये असे नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अधिनियमातील तरतुदी तसेच तत्सम आदेश याचा

सारासार विचार करुन जी माहिती सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन उघड करणे उचित होणार नाही ती सर्व माहिती वगळून उर्वरित जसे महाराष्ट्र फायर प्रिव्हेंशन अँड लाईफ सेफ्टी मेजर्स अॅक्ट २००६, फीस, शासन आदेश इ. बाबतची कागदपत्रे व संख्यात्मक माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांनी आज रोजीच्या सुनावणीच्या अनुषंगाने त्यांचे दि.१६.१२.२०२४ रोजीचे लेखी निवेदन आयोगाच्या पटलावर सादर केलेले आहे. त्यामध्ये त्यांनी फायर परवानगीसाठी कोणकोणती कागदपत्रे दाखल करावी लागतात व फीस किती भरावी लागते या शासन नियमावलीची माहिती मिळुन द्यावी, असे नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपुरी माहिती मिळाली, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप अग्निशमन केंद्र अधिकारी, अग्निशमन विभाग, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद माहितीसंदर्भात फायर परवानगीसाठी कोणकोणती कागदपत्रे दाखल करावी लागतात व फीस किती भरावी लागते या शासन नियमावलीची माहिती (उर्वरित सर्व माहिती वगळून), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपआयुक्त (कर), महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ.७८५३/२०२२/एस/ 33 दिनांक : 7/1/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १००५३/२०२२

श्री.लक्ष्मण डिगंबर भुतकर, — अपिलार्थी
रा.आंबेडकरनगर, एन-७, सिडको, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप अग्निशमन केंद्र अधिकारी,
अग्निशमन विभाग, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्य अग्निशमन अधिकारी,
अग्निशमन विभाग, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर.

(सुनावणी दिनांक १६.१२.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.०७.१२.२०२२ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.नंदकुमार घुगे, प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अग्निशमन अधिकारी, श्री.आर.बी.पाटील उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| ०९ | २४.०८.२०२२ | आपल्या अग्निशमन कार्यालयात रुजु असलेले अधिकारी श्री.आर.के.सुरे यांचा शासन रुजु सेवा कार्यकाळ व त्यांचा अहवाल, त्यांनी शासन सेवेत रुजु होताना सादर केलेले शैक्षणिक, तांत्रिक अर्हता, यांना शासनाकडे सादर केलेला अपत्य अहवाल, त्यांनी याबाबत शासनाकडे सादर केलेल्या माहितीचा संपूर्ण तपशिल, एकुण अपत्याचे नाव, जन्मतारीख, ते शासन सेवेत रुजु झाल्याचा अहवाल, प्रथम नियुक्ती दिनांक, त्याचा तपशिल, सेवापुस्तिका आदी स्वरुपाची माहिती छायांकित प्रतीत देण्यात यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे त्रयस्थ अधिकारी यांची माहिती मागितलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जास दि.०५.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, अधिकाऱ्यांशी संबंधित माहिती जनहिताची किंवा व्यापक जनहिताची नसल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ (१) (त्र) नुसार माहिती देण्याचे बंधन नाही, यानुसार अर्ज निकाली काढण्यात येत असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर तत्कालीन

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, दिशाभूल करणारे पत्र दिले, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे त्रयस्थपक्षाशी संबंधित माहिती मागितलेली आहे. त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थपक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. या नंतर माहिती प्रकट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रकट करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये कोणतेही व्यापक जनहित दिसुन येत नाही. तसेच मागणी केलेली माहिती प्रकट केल्यास नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होऊ शकते, याबाबत अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये काहीही नमूद केलेले नाही. सारांशाने या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.१००५३/२०२२/एस/ 34 दिनांक : 2/1/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०२५६/२०२२**

श्री.शिवलाल मिठु खरात, — अपिलार्थी
रा.प्रसन्न दाता पार्क, देवळाई रोड, छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पशुसंवर्धन अधिकारी,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप आयुक्त,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १६.१२.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.१५.१२.२०२२ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| १० | १९.०७.२०२२ | औरंगाबाद मधील मटन चिकन इतर जनावरे विक्री व परवानाबाबत, किती दुकान हे परवानाधारक आहे, कत्तल होत असलेले जनावराचे मेडीकल रिपोर्ट या बाबत पाच मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांच्या दि.२८.०७.२०२२ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०९.०९.२०२२ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसुन येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, सात दिवसात विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन मामहिती अधिकारी यांना ओदशित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीसाठी कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील कागदपत्रावरुन होत नाही. मात्र अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा पशुसंवर्धन अधिकारी, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार

देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क देण्यात यावी.

२. उपआयुक्त, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.वि.अ.१०२५६/२०२२/एस/ 35 दिनांक : 2/1/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०२५७/२०२२**

श्री.शिवलाल मिठु खरात,
रा.प्रसन्न दाता पार्क, देवळाई रोड, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
पदनिर्देशित अधिकारी (अतिक्रमण),
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त आयुक्त -२,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १६.१२.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.१५.१२.२०२२ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| ११ | २३.०९.२०२२ | १. अतिक्रमण विभागाच्या आतापर्यंतच्या ४७८ च्या किती नोटीसा दिल्या व त्यावर कार्यवाही केली, २०२१ व २०२२ या वर्षाची माहिती, २. अतिक्रमण विभागात कर्मचारी व इमारत निरीक्षक किती याबाबत माहिती व या विभागाकडुन मनपाला आतापर्यंत किती उत्पन्न मिळाले, सन २०२१-२२ माहिती मिळेपर्यंत, |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांच्या दि.१९.१०.२०२२ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२१.११.२०२२ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसुन येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अतिक्रमण विभागात कार्यरत कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांची नावे अशी माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन मामहिती अधिकारी यांना ओदशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन, जन माहिती अधिकारी यांनी दि.१८.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, मुद्दा क्र.१ च्या माहितीसंदर्भात विशिष्ट व्यक्तीचे नाव व स्थळ दर्शविल्यास माहिती देय होईल असे अपिलार्थी यांना कळवून मुद्दा क्र.२ ची माहिती आस्थापना विभागाकडुन परस्पर हस्तगत करण्याचे अपिलार्थी यांना सुचित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कुठल्याही प्रकारची माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जातील मुद्दा क्र.१ व्दारे मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची असुन स्वरुप विस्तृत आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दिष्ट सफल

होत नाहीत. ही बाब विचारात घेता प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी (अतिक्रमण), महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद माहितीसंदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील निर्णयाव्दारे आदेशित केलेली माहिती (अतिक्रमण विभागात कार्यरत अधिकारी / कर्मचाऱ्यांची यादी), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अतिरिक्त आयुक्त-२, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.१०२५७/२०२२/एस/- 36 दिनांक :- 7/1/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३३९७ व ३३८९/२०२२ (०२)**

श्री.मोहम्मद नेमान मोहम्मद युनूस शेख, — अपिलार्थी
रा.मेंटार कॉम्प्युटर, दुकान क्र.२, गुलशन महल, जुने जिल्हाधिकारी कार्यालय, परिसर, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वैद्यकीय अधिकारी,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
आरोग्य वैद्यकीय अधिकारी,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १६.१२.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.११.०४.२०२२ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| १२ | ०३.०२.२०२२ | महानगरपालिका औरंगाबाद यांच्या अंतर्गत येणारे सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य केंद्र मधील वैद्यकीय अधिकारी यांचे येण्याचे - जाण्याचे वेळ व त्यांचे आठवड्यात दिली जाणारी सेवा संबंधित दिवस याची संपूर्ण माहिती देण्यात यावी. |
| १३ | ०३.०२.२०२२ | प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य केंद्र मधील वैद्यकीय अधिकारी यांचे येण्याचे - जाण्याचे वेळ व त्यांचे आठवड्यात दिली जाणारी सेवा संबंधित दिवस शासन निर्णय देण्यात यावा व याची संपूर्ण माहिती देण्यात यावी. |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीसाठी कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील कागदपत्रावरुन होत नाही. मात्र अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, आरोग्य विभाग, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद दोनही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ.३३९७ व ३३८९/२०२२/एस/- 37 दिनांक :- 2/1/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५३३६/२०२२

श्री.सय्यद झाकिर अली सय्यद महमुद अली, — अपिलार्थी
रा.अमीन उर्दू शाळेजवळ, आसिफिया कॉलनी, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उपअभियंता,
गुंठेवारी कक्ष, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कक्ष प्रमुख,
गुंठेवारी कक्ष, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक १६.१२.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.२८.०६.२०२२ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी या पदाचा नियमित पदभार असुन प्रथम अपिलीय अधिकारी या पदाचा अतिरिक्त पदभार आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडुन प्राप्त झालेली आहे. सदर प्राप्त झालेल्या माहितीबाबत कोणतीही तक्रार राहिली नसल्यामुळे विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.५३३६/२०२२/एस/-38 दिनांक :-2/1/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ६०९२/२०२२

श्री.सुभेदार इर्शाद मुहमद खान, — अपिलार्थी
रा.१-२४-५३/पी, रोहिला गल्ली, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
झोन अधिकारी, झोन क्र.०४,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपआयुक्त (कर)
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक १६.१२.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.१८.०७.२०२२ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| १५ | २१.०३.२०२२ | अपिलार्थी यांनी दि.०२.०३.२०२२ रोजीचा तक्रार अर्ज माहिती अर्जासोबत सादर करुन या अर्जावरील कार्यवाहीची माहिती मागितलेली आहे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि या नंतरही माहिती देण्यात आलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यात आलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

### आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा झोन अधिकारी, झोन क्र.४, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपाआयुक्त (कर), महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मर्कस्द रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ.६०९२/२०२२/एस/ 39 दिनांक : 2/1/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४०२८/२०२२**

श्री.निवृत्ती रंगनाथ सोनवणे, अपिलार्थी
रा.सवंदगाव, ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांचे कार्यालय,
जिल्हा परिषद उपविभाग (ल.पा.) वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय जलसंधारण अधिकारी,
जिल्हा परिषद उपविभाग (ल.पा.) वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १६.१२.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.०५.०५.२०२२ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| १६ | २८.०२.२०२२ | मौजे सवंदगाव, ता.वैजापूर येथील नजीक रस्ता क्र.४१ याच्यावर सिमेंट नाली बां. झालेला आहे, आपल्या पत्रानुसार म्हणतात की, रस्त्यावर नाही, तर नाल्याचा नकाशा नं.१, नंबर २ रस्त्याच्या नकाशा प्रमाणित प्रतीसह अहवाल देणे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांचे कार्यालय, जिल्हा परिषद उपविभाग (ल.पा.) वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद उपविभाग (ल.पा.) वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.
३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.विद्.अ.४०२८/२०२२/एस/- 40 दिनांक :- 2/1/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५०७६/२०२२ व ११४९/२०२३ (०२)

श्री.प्रतापराव गंगाधर सोमवंशी,
रा.लाडगाव, ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
नांदुर मधमेश्वर पाटबंधारे विभाग, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
नांदुर मधमेश्वर पाटबंधारे विभाग, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १६.१२.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.२०.०६.२०२२ व दि.१४.०२.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| १७ | २२.०३.२०२२ | अपिलार्थी यांनी माहिती अर्जासोबत दि.२२.०३.२०२२ रोजीचे निवेदन सादर करुन त्या निवेदनाच्या अनुषंगाने माहितीची मागणी केलेली आहे. |
| १८ | २२.०३.२०२२ | अपिलार्थी यांनी माहिती अर्जासोबत दि.२२.०३.२०२२ रोजीचे निवेदन सादर करुन त्या निवेदनाच्या अनुषंगाने माहितीची मागणी केलेली आहे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद देऊन शुल्काचा भरणा करणेबाबत अपिलार्थी यांना सुचित केलेले आहे. तसेच अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना पुरविण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्यास सर्व माहितीची त्यांना आयोगाकडील निर्देशानुसार पाहणी देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, नांदुर मधमेश्वर पाटबंधारे विभाग, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद दोनही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध

असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती (पूर्वी दिलेली माहिती वगळून) अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता, नांदुर मधमेश्वर पाटबंधारे विभाग, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.५०७६/२०२२ व ११४९/२०२३/एस/--41-------- दिनांक :--7/1/2025-----

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ९१८२/२०२२**

श्री.गुलाबराव तुकाराम भोंडवे, — अपिलार्थी
रा.आहिल्या निवास, राधाकृष्ण नगरी, पांगरी रोड, ता.जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कनिष्ठ प्रशासन अधिकारी,
शिक्षण उपसंचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
शिक्षण उपनिरीक्षक,
शिक्षण उपसंचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १६.१२.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.१४.११.२०२२ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. तसेच अपिलार्थी यांचे विधीज्ञ उपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| १९ | १२.०९.२०२२ | जय मल्हार अध्यापक विद्यालय (डी.एड.) सोनेगाव ता.पाटोदा, जि.बीड या अध्यापक विद्यालयाची संच मान्यता व शिक्षण मान्यता सन २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ च्या छायांकित प्रती मिळाव्यात. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे विधीज्ञ यांनी अवगत केले की, माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. तथापि विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी या पदाचा पदभार नुकताच स्विकारलेला असुन त्यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अंबाजोगाई, जि.बीड यांचेकडे दि.१३.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेली आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अंबाजोगाई, जि.बीड यांनी त्यांच्या दि.१९.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सर्व माहिती दि.२०.०६.२०२४ पर्यंत शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे सादर करण्याचे प्राचार्य, जय मल्हार अध्यापक विद्यालय, सोनेगाव, ता.पाटोदा, जि.बीड यांना कळविलेले आहे. सदर माहिती संबंधित कार्यालयाकडुन अप्राप्त असल्यामुळे ती अपिलार्थी यांना देता आलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देत नाहीत, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे विधीज्ञ यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी

केलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाशी संबंधित असल्यास अशा माहितीकरिता अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) नुसार जास्तीत जास्त पाच दिवसात माहितीशी संबंधित कार्यालयाकडे हस्तांतरित करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे कलम ६ (३) नुसार सुसंगत हस्तांतरण झालेले नसल्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस आता कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार माहितीशी संबंधित कार्यालयाकडुन एकत्रित / संकलित करुन द्यावी लागेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

<u>आदेश</u>

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, शिक्षण उपसंचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद माहिती ज्या कार्यालयाकडे उपलब्ध आहे ती त्या कार्यालयाकडुन कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार एकत्रित / संकलित करुन अशी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. शिक्षण उपनिरीक्षक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.
३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ.११८२/२०२२/एस/ 42 दिनांक : 7/1/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १०४३३/२०२२

श्री.देशमुख मोईन अब्दुल लतीफ,
रा.घर नं.१०/८, गजानन हौसिंग सोसायटी, जुना मुकुंदनगर, औरंगाबाद रोड, अहमदनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक),
वनपरिक्षेत्र कार्यालय, अंजिठा, ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (प्रादेशिक),
सहायक वनसंरक्षक कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १६.१२.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.१९.१२.२०२२ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| २० | २२.०३.२०२२ | आपल्या कार्यालयातील सध्या कार्यरत असलेले आरएफओ यांचे ०१ जाने २०२० ते आजरोजी पर्यंतचे मासिक दैनंदिनीचे साक्षांकित प्रती द्यावे. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२३.०४.२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, अपिलकर्त्याने कर्मचारी व अधिकाऱ्यांशी संबंधित मागितलेली माहिती ही त्यांची वैयक्तिक स्वरुपाची असल्याने मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांच्याकडील स्पेशल लिव्ह पिटीशन क्र.२७७३४ / २०१२ निर्णय दि.०३.१०.२०१२ नुसार वैयक्तिक स्वरुपाची माहिती कलम ८ (१) (जे) नुसार प्रकट करण्यास अपवाद ठरविण्यात आली असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी या प्रकरणी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे त्रयस्थ अधिकारी यांचेशी संबंधित माहिती मागितलेली आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्रगट केल्यास नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होऊ शकते याबाबत अपिलार्थी यांनी त्यांचे व्दितीय अपिलामध्ये काहीही नमूद केलेले नाही. सारांशाने अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अधिनियमातील

कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे ती अपिलार्थी यांना देय होणार नाही. सबब,जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२३.०४.२०२२ रोजी दिलेल्या प्रतिसादामध्ये बदल करण्याची आवश्यकता नसल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.वि.अ.१०४३३/२०२२/एस/ 43 दिनांक : 2/1/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २२३/२०२२

श्री.शेख जिलानी शेख कादर, — अपिलार्थी
रा.प्लॉट नं.०६, पेरिविकल इंग्रजी शाळेसमोर, काला दरवाजा,
छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक १६.१२.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.१२.०१.२०२२ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| २१ | १२.११.२०२१ | गट नं.३८ नवाबपुरा पिक पेराबाबत, जुलै-नोव्हेंबर २०२१, श्रीमती पठाण यांचा दि.२७.०७.२०२१ यांच्या मौजे नवाबपुर ता.गंगापूर येथील शेत जमीन गट क्र.३८ ला मनाई हुकूमप्रमाणे पिक पेरा लावणे तसेच मोहमंद शोएब शेख जिलानी रा.औरंगाबाद यांच्या अर्जावर दि.२७.०७.२०२१ ते आजपर्यंत आपल्या कार्यालयातर्फे केलेल्या कार्यवाहीच्या प्रती मिळणेस विनंती. |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीसाठी कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील कागदपत्रावरुन होत नाही. मात्र अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळालेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती

अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क देण्यात यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ.२२३/२०२२/एस/--44-- दिनांक :-7/1/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

व्दितीय अपील क्रमांक २१६०/२०२२

श्री.प्रमोद त्रिंबकराव भालेराव,
रा.नृसिंह कॉलनी समोर, गंगापूर, ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार (म-१),
तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १६.१२.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.२५.०२.२०२२ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| २२ | २०.०८.२०२१ | अर्जदाराने आपल्या कार्यालयात दि.२५.०१.२०२१, दि.०३.०३.२०२१, दि.१६.०४.२०२१, दि.१७.०४.२०२१ आणि दि.१५.०७.२०२१ रोजी साल सन २०१४-१५ ते साल सन २०२०-२०२१ पर्यंतची गंगापूर तालुक्याची गावनिहाय खरीप व रब्बी पिकाच्या आणेवारीची माहिती मिळणेबाबतच्या अर्जावर आपल्या कार्यालयाने काय कार्यवाही केली आहे, त्या कार्यवाहीच्या तपशिलासह गंगापूर तालुक्याची गावनिहाय खरीप व रब्बी पिकाच्या आणेवारीची माहिती प्रमाणित करुन मिळणेबाबत,<br>२. दैनिक लोकमत मदतीचा हात यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.एचएल ७८० / डीबीपी दिनांक ०५.०८.२०२१ च्या पत्रावरते आपल्या कार्यालयाने काय कार्यवाही केलेली आहे केलेल्या कार्यवाहीसह सदर पत्राची छायांकित प्रतीत माहिती प्रमाणित करुन देण्यात यावी, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीसाठी कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील कागदपत्रावरुन होत नाही. मात्र अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळालेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (म-१), तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क देण्यात यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.वि.अ.२१६०/२०२२/एस/ 45 दिनांक : 7/1/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ८०९८/२०२२

श्री.भास्कर शामराव जगताप, — अपिलार्थी
रा.कोटनांद्रा, पो.तळणी, ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (निवडणूक),
तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १६.१२.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.२९.०९.२०२२ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| २३ | ०८.०६.२०२१ | एप्रिल / मे २०२२ मध्ये झालेल्या ईटावां ग्रामपंचायत व कासोडा ग्रामपंचायत ता.गंगापूर पोटनिवडणूकमध्ये विजयी झालेल्या नवनिर्वाचित ग्रामपंचायत सदस्याचे अनुसुचित जमाती जात प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर केलेले संचिकाची छायांकित प्रती व विजयी प्रमाणपत्र, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीसाठी कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अथवा माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील कागदपत्रावरुन होत नाही. मात्र अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती उपलब्ध करुन न दिल्याकारणाने, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केलेली आहे. त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थपक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्य दृष्टीकोनातुन योग्य ठरते. या नंतर माहिती प्रकट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रकट करणे आवश्यक आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती उघड केल्यास नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होऊ शकते याबाबत

त्यांनी व्दितीय अपिलामध्ये काहीही नमूद केलेले नाही. सारांशाने अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे ती अपिलार्थी यांना देय होणार नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.८०९८/२०२२/एस/ 46 दिनांक : 7/11/2025